तात्काळ

क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन (एकरकमी)/१७/२०१८ मुंबई, दि.19 /०३/२०१८

**संदर्भ :-** **१)** या कार्यालयाचे परिपत्रकीय आदेश क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/१७/२०१८, दि.०७/०४/२०१८ आणि
**२)** या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन प्रणाली/९०/२०१८, दि.१७/०५/२०१८

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याबाबत

*****

परिपत्रक

राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर प्रणालीव्दारे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना मंजूर केलेल्या अग्रिमाबाबतचे व्यवहार करण्यासाठी ॲक्सीस बँकेने उपलब्ध करुन दिलेली Paypro ही प्रणाली वापरण्याबाबतही घटक कार्यालयांना संदर्भाधिन परिपत्रकाव्दारे सूचना दिल्या आहेत. तसेच, या योजनेअंतर्गत **अग्रिमाची रक्कम अदा केल्यानंतर लगतच्या महिन्यापासून मुद्दलाची वसुली न चुकता करण्यात यावी, असेही कळविण्यात आले होते.**

२. तथापि, असे निर्दशनास आले आहे की, बऱ्याच घटक कार्यालयांकडून अग्रिमधारकांना रक्कम अदा केल्यानंतर लगतच्या महिन्यापासून मुद्दलाची वसूली करण्याऐवजी त्यांनी त्याच महिन्यात वसूली केली आहे. त्यामुळे संबंधित अग्रिमधाकांकडून एका हप्त्याची जादा रक्कम वसूल केली आहे. सबब, या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक असलेली व प्रत्यक्षात प्राप्त झालेली रक्कम यामध्ये तफावत निर्माण झाली आहे. यामध्ये या कार्यालयाच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यात अधिकची रक्कम दिसून येत आहे, त्यामुळे ताळमेळ करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.

३. या करिता ज्या कर्मचाऱ्यांचे बाबतीत अशा प्रकारची चुकिची कार्यवाही करण्यात आली आहे, त्यांची या महिन्याच्या (मार्च २०१९) वेतनातून हप्त्याची कपात न करता, ज्या महिन्यामध्ये संबंधीतास अग्रीम अदा करुन त्याच महिन्यात हप्ता कपात केला आहे, त्या हप्त्याच्या रकमेचा युटीआर क्रमांक अपडेट करावयाचा आहे. परंतु, सदरची कार्यवाही करण्यापूर्वी संबंधीत कार्यालयास त्या कर्मचाऱ्यांच्या नावासहीत सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. माहिती निरंक असल्यास "निरंक" असे नमूद करुन तसे प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीने देणे बंधनकारक राहील. संदरचे प्रमाणपत्र प्रत्यक्ष या कार्यालयास सादर केल्याशिवाय वरिलप्रमाणे संबंधीत कर्मचाऱ्याच्या मार्च २०१९ च्या वेतनातून हप्ता वसूल न

करण्याबाबतची कार्यवाही केली जाणार नाही याची संबंधीत घटक कार्यालयाने नोंद घ्यावी. सदर निर्देशांचे पालन न केल्यास संबंधिताविरुध्द शिस्त व अपिल १९७९ अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल.

४. सबब सदर बाबीचे गांभीर्य लक्षात घेता, खालील नमूद घटक प्रमुखांना सूचित करण्यात येते की, त्यांनी जर त्यांच्या अधिपत्याखालील घरबांधणी अग्रिमाची रक्कम अदा केलेल्या अग्रिमधारकांकडून लगतच्या महिन्याऐवजी, त्याच महिन्यामध्ये संबंधिताकडून हप्त्यांची रक्कम वसूल करुन या कार्यालयास पाठविली असेल तर त्याची माहिती सोबतच्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधीत घटक कार्यालयांना नेमूण देण्यात आलेल्या दिनांकास सोबतच्या प्रमाणपत्रासह संबंधित कार्यभार हाताळत असलेल्या लिपिक व कार्यालय अधीक्षक यांना या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे. जेणे करुन परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधीत कार्यालयास कार्यवाही करणे सोयीस्कर होईल व त्यामुळे ताळमेळ घेणे शक्य होईल.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (रेल्वेसह) (पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई व सोलापूर शहर कार्यालय वगळून)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, /विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/रा.रा.पो.बल /पुणे
सर्व पोलीस अधीक्षक
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर/नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र, गोरेगांव, मुंबई
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे (तूरची, सांगली / सोलापूर / नाशिक) /अ.अ.प्र.के., नागपूर
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६/रज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे
अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण, नवी मुंबई / पुणे /नागपूर / अमरावती
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोंकण भवन, /नाशिक / कोल्हापूर

# प्रमाणपत्र

| अ. क्र | अग्रिमधारकाचे नाव | पो.म.सं. कार्यालयाकडून प्राप्त रक्कम | पो.म.सं. कार्यालयाकडून रक्कम प्राप्त झाल्याचा दिनांक | संबंधित कर्मचाऱ्याच्या अग्रिमाची रक्कम | संबंधीत अग्रिमधारकास अग्रिम अदा केल्याचा दिनांक | संबंधित अग्रिमधारकाचा पहिला हप्ता वसूल केल्याचा दिनांक | हप्त्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७ | ८. |
| | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, या कार्यालयाच्या आस्थापनेवरील वरीलप्रमाणे नमूद अग्रिमधारकांना ज्या महिन्यात अग्रिम अदा केले, त्याच महिन्यात त्यांच्या वेतनातून हप्त्याची वसूली करण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त इतर कोणत्याही अग्रिमधारकांच्या वेतनातून, त्यांना अग्रिमाची रक्कम अदा केली त्या महिन्यामध्ये कपात करण्यात आलेली नाही. तसेच, पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून अद्यापपर्यंत या कार्यालयास प्राप्त झालेली घरबांधणी अग्रिमाची रक्कम अग्रिमधारकांना अदा करणे सद्यस्थितीत प्रलंबित नाही.

(कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का)

## घटक कार्यालयांनी या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबतचे वेळापत्रक

| अक्र | घटक कार्यालयाचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १ | अपर उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोकण नवी मुंबई<br>पोलीस अधीक्षक, गु.अ.वि. कोकण भवन<br>विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन मुंबई<br>पोलीस आयुक्त, ठाणे शहर<br>पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण<br>पोलीस आयुक्त, नवी मुंबई<br>विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर मुंबई<br>समादेशक, रारापोबल गट क्र. ८ मुंबई<br>समादेशक, रारापोबल गट क्र. ११ नवी मुंबई<br>पोलीस अधीक्षक, नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र, मुंबई<br>प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विदयालय, मरोळ | १३/०३/२०१९ |
| २ | पोलीस आयुक्त, पूणे शहर<br>अपर पोलीस महासंचालक, गुअवि म.रा.पुणे<br>अपर उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, पुणे<br>विशेष पोलीस महानिरिक्षक, रारापोबल पुणे<br>समादेशक, रारापोबल गट क्र. १ पुणे<br>समादेशक, रारापोबल गट क्र. २ पुणे<br>प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विदयालय, रारापोबल नानवीज-दौंड<br>समादेशक, रारापोबल गट क्र. ५ दौंड<br>समादेशक, रारापोबल गट क्र. ७ दौंड<br>पोलीस अधीक्षक, गु.अ.वि. नाशिक<br>पोलीस आयुक्त, नाशिक शहर<br>पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण | १४/०३/२०१९ |
| ३ | पोलीस अधीक्षक, गु.अ.वि. कोल्हापूर<br>पोलीस अधिक्षक, रायगड<br>पोलीस अधिक्षक, रत्नागिरी<br>पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग<br>पोलीस अधिक्षक पालघर<br>पोलीस अधिक्षक, जळगांव<br>पोलीस अधिक्षक, धुळे<br>पोलीस अधिक्षक, नंदुरबार | १५/०३/२०१९ |
| ४ | अपर उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, नागपूर<br>अपर उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, अमरावती<br>पोलीस आयुक्त, नागपूर शहर<br>पोलीस आयुक्त, अमरावती शहर<br>पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर<br>पोलीस अधिक्षक, अहमदनगर<br>पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण<br>दहशतवाद विरोधी पथक, नागपूर | १६/०३/२०१९ |